# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
(शिक्षण विभाग)

क्रमांक : 1623 / शि.वि. / 2014 दिनांक : 14 / 02 / 2014

## अतिशिघ्र / अत्यंत महत्वाचे

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा, म.न.पा., नागपूर

**विषय :— वेतन काढत असणाऱ्या देयक लिपीकांना तात्काळ भेटून आवश्यक माहिती देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये शिक्षकांचे वेतन अनुदान देयक शालार्थ या महाराष्ट्र शासनाने निर्देशित केलेल्या प्रणालीमधून Online पध्दतीने आहारीत करावयाचे असल्याचे शिक्षण संचालनालयाचे निर्देश आहेत. प्रस्तुत शालार्थ प्रणालीमध्ये आपल्या शाळेतील सर्व शिक्षकांची मुख्याध्यापकांसह नोंद करावयाची आहे. प्रस्तुत नोंद करण्यासाठी विहीत प्रपत्रात माहिती तात्काळ आपले देयक लिपीकांकडे भरावयाची आहे. यासाठी प्रस्तुत पत्र Online पध्दतीने प्राप्त होताच **मुख्याध्यापक / प्रभारी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी स्वतःचे एक फोटो, आधार कार्ड क्रमांक (आधार कार्ड प्राप्त झाले नसल्यास आधार कार्ड ची स्लिप चा क्रमांक) व पॅन कार्ड क्रमांक** ही माहिती आपले झोन चे देयक लिपीक यांना तात्काळ व्यक्तीशः सादर करावी.

प्रस्तुत माहिती भरत असतांना प्रत्येक शिक्षकाची माहिती प्रपत्रावर स्वाक्षरी आवश्यक आहे. तसेच शाळेतील प्रत्येक शिक्षकाच्या प्रपत्रावर संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांची सुध्दा स्वाक्षरी आवश्यक आहे. यामुळे कोणीही परस्पर प्रपत्र भरून पाठवू नये. देयक लिपीकांची सर्व शिक्षकानी व मुख्याध्यापकांनी स्वतः समक्ष भेट घेवून प्रपत्र तपासून स्वाक्षरी करून प्रपत्र सादर करावे. प्रस्तुत प्रपत्र प्राप्त न झाल्यास याचा परिणाम शिक्षकांचे वेतनापोटी प्राप्त होणाऱ्या वेतन अनुदानावर होण्याची शक्यता आहे. ही माहिती देयक लिपीकांकडे पोहचविण्याकरीता दि.15.02. 2014 पासून दि.17.02.2014 पर्यंत वेळ निर्धारित करण्यात येते. या कालावधीत ज्यांचे प्रपत्र जमा होणार नाही, त्यांचे माहे जानेवारी पेड फेब्रुवारी 2014 चे वेतन प्रपत्र प्राप्त होईपर्यंत स्थगीत ठेवण्याचे निर्देश संबंधीत बॅंकांना देण्यात येतील. याची गंभीरपणे नोंद घ्यावी.

**टिप** – प्राथ. आस्थापनेवरील जे शिक्षक माध्यमिक शाळेत अद्यापन करतात, परंतू वेतन प्राथमिक विभागातील देयक लिपीकामार्फत निघते. अशा सर्व शिक्षकांनीही आपले देयक लिपीकांना भेटून उपरोक्त नमुद माहिती सादर करावी. व प्रपत्र भरावे.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर